MHOS140002322018

**भुसंपादन अर्ज क्रमांक ६९/२०१८**
गयाबाई वि. शासन

# <u>अर्ज निशाणी २९ वरील आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश ६ नियम १७ अनुसार दाखल केला आहे. अर्जातील कथन की मौजे कौडगाव, ता. परंडा येथील शेतजमीन गट क्रमांक ३९/अ क्षेत्र ५६ आर, गट क्रमांक ११५/अ क्षेत्र ५ हे. १ आर, गट क्रमांक १२८ क्षेत्र ७ हे. ६० आर, गट क्रमांक १२९/अ क्षेत्र ५ हे. ३१ आर व गट क्रमांक ४२/२ क्षेत्र २४ आर असे १८ हे. ९२ आर शेतजमीन अर्जदार यांची वडीलोपार्जित जमिनी आहेत. सदर जमिनीचे एकुण क्षेत्र १८ हे. ९२ आर शासनाने सिना कोळेगाव प्रकल्पासाठी संपादित केलेली आहे. पुढे अर्जातील कथन की मुळ पुरुष मयत कृष्णा खोरे यांच्या दुसऱ्या पत्नीचा मुलगा महादेव कृष्णा खोरे याने संपादित जमिनीपैकी १४ हे. ७२ आर क्षेत्राचा वाढीव मोबदला मिळण्याकरिता भुसंपादन अर्ज क्रमांक ३१७/२०१५ दाखल केला होता. प्रस्तुत प्रकरणातील अर्जदाराने वडीलोपार्जित वर नमुद सर्व जमिनीतील त्यांचा असलेला अविभक्त हिस्सा वाटून मिळण्याकरिता तसा दावा क्रमांक १८९/१९९७ दाखल केला होता आणि सदरचा दावा दिनांक २५.१०.२०१० रोजी मंजुर झाला. वर नमुद दाव्यातील हुकूमनाम्याप्रमाणे अर्जदारासह दाव्यातील इतर प्रतिवादींना हिस्सा वाटून देण्यात आलेला आहे.

२. पुढे अर्जातील कथन की, प्रस्तुत प्रकरण दाखल करतेवेळेस संपादित झालेल्या वडीलोपार्जित असलेल्या अर्जदारांचा हिस्सा निश्चीत झालेला नव्हता म्हणून संपादित जमिनीचे क्षेत्र नमुद करण्यात आलेले नाही. तरी अर्जात सुचविलेल्या दुरुस्तीप्रमाणे वादपत्रात दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात यावी अशी विनंती केली आहे.

३. गैरअर्जदारांनी त्यांचे लेखी म्हणणे दाखल केले नाही.

४. उभय पक्षांचे कथनावरुन खालीलप्रमाणे मुद्दे काढुन त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसह नोंदविण्यात येत आहे.

| **अ. क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | प्रस्तुतचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे काय? | होय |
| २ | कोणता आदेश? | अंतीम आदेशाप्रमाणे |

**कारणमिमांसा**

**मुद्दा क्रमांक १ व २ करिता**

५. संचिकेचे अवलोकन केले असता प्रस्तुतचे प्रकरण संपादित झालेलया जमिनीचे वाढीव मोबदला मिळण्याकरिता दाखल करण्यात आला आहे. प्रस्तुत अर्जातील कथनावरुन असे दिसून येते की, मौजे कौडगाव, ता. परंडा येथील शेतजमीन गट क्रमांक ३९/अ क्षेत्र ५६ आर, गट क्रमांक ११५/अ क्षेत्र ५ हे. १ आर, गट क्रमांक १२८ क्षेत्र ७ हे. ६० आर, गट क्रमांक १२९/अ क्षेत्र ५ हे. ३१ आर व गट क्रमांक ४२/२ क्षेत्र २४ आर असे १८ हे. ९२ आर शेतजमीन अर्जदार यांची वडीलोपार्जित जमिनी आहेत. सदर जमिनीतील अर्जदारांचा असलेला अविभक्त हिस्सा वाटून मिळण्याकरिता त्यांनी दिवाणी दावा क्रमांक १८९/१९९७ दाखल केला होता आणि सदर दाव्यातील हुकूमनाम्याच्या आधारे अर्जदारांचा हिस्सा निश्चीत करण्यात आला आहे. पुढे न्यायालयाच्या असे निदर्शनास येते की वादपत्रात अर्जदारांनी संपादित झालेल्या गटातील क्षेत्राचा तसेच त्यांच्या हिश्शयाचा उल्लेख केलेला नाही. दाव्याचे स्वरुप पाहता संपादित झालेले क्षेत्र गट नंबरसह नमुद असणे आवश्यक आहे. तसेच अर्जदारांचा हिस्सा देखील नमुद असणे आवश्यक आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. त्याअनुषंगाने मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज **निशाणी क्रमांक २९ मंजुर करण्यात आला.**

२. प्रस्तुत अर्जात सुचविलेली दुरुस्ती अर्जदारांनी वादपत्रात आजपासून आठ दिवसांच्या आत करुन दुरुस्त प्रत सादर करावी.

ABDUL KARIM ABDUL RAHIMAN SHAIKH

Digitally signed by ABDUL KARIM ABDUL RAHIMAN SHAIKH
Date: 2025.10.04 15:54:42 +0530

दिनांकः–०४.१०.२०२५

( **अ. अ. शेख** )

दिवाणी न्यायाधीश व. स्तर, परंडा

CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F file Judgment/Order/Record and Document are same, word to word, as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | - | Vaibhav Mohanrao Ingale<br>Stenographer (Grade-III) |
| Court | - | Civil Court Senior Division, Paranda. |
| Date | - | 04-10-2025 |
| Order signed by the presiding officer on | - | 04-10-2025 |
| Order uploaded on | - | 04-10-2025 |